# डेक्कन मिरर

www.deccanmirror.news

विजयी भव: विशेषांक

भारतीय प्रजासत्ताक दिन चिरायू होवो.!

पुणे | सोमवार । २६ जानेवारी २०२६ । वर्ष १ ले । अंक २ रा | ★ ★ पाने १० । किंमत ₹ १०


# 'डेक्कन मिरर'चा अंदाज ठरला खरा!

# प्रभाग क्र. ३ व ४ मधून सर्व भाजपा उमेदवार विजयी



श्रेयस खांदवे | अनिल सातव | ऐश्वर्या पठारे | रामदास दाभाडे | शैलजीत बनसोडे | रत्नमाला सातव | तृप्ती भरणे | सुरेंद्र पठारे

## > वाघोलीच्या तीन नगरसेवकांचा आवाज मनपाच्या सभागृहात घुमणार > भाजप उमेदवारांचे ऐतिहासिक मताधिक्य

**वाघोली : प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत महत्त्वाच्या लढतींमध्ये लढत असणाऱ्या नगररोड-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयातील तिन्ही प्रभागांमध्ये भाजपने मुसंडी मारली असून १२ पैकी १२ जागांवर भाजपचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. वाघोलीचा महापालिकेत समावेश झाल्यानंतर पहिल्यांदाच झालेल्या निवडणुकीत वाघोलीचे तीन उमेदवार निवडून आले असून प्रभाग तीन व चार या मूलभूत प्रभागांसाठी वाघोलीच्या तीन नगरसेवकांचा आवाज महापालिकेच्या सभागृहात घुमणार आहे.

प्रभाग क्रमांक तीन, चार, पाच मध्ये सुरुवातीच्या फेऱ्यांपासून भाजपच्या उमेदवारांना मिळालेली आघाडी शेवटच्या फेरीपर्यंत राहिली. भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी 'काटे की टक्कर' म्हणून पाहण्यात आलेल्या या निवडणुकीत भाजपने एकहाती गड राखला आहे. प्रभाग क्रमांक तीन, चार, पाच मध्ये भाजपचे सर्वच उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले. १२ पैकी एकाच उमेदवाराला ८ हजारांचे मताधिक्य आहे तर इतर ११ उमेदवारांना ११ हजारांहून अधिकचे मताधिक्य मिळाले आहे.

विजयानंतर भाजप कार्यकर्त्यांकडून गुलाल, भंडाऱ्याची उधळण करून एकच जल्लोष साजरा करण्यात आला.

### विजयी उमेदवारांना मिळालेली एकूण मते व कंसात मताधिक्य

**प्रभाग क्रमांक ३ :**


अ) डॉ. श्रेयस प्रीतम खांदवे ३००२८ (९४६८)
ब) अनिल दिलीप सातव ३६३६४ (१७९७३)
क) ऐश्वर्या सुरेंद्र पठारे ३६३८१ (१६००)
ड) रामदास दत्तात्रय दाभाडे ३३५८८ (१११७५)

**प्रभाग क्रमांक ४ :**

अ) शैलजीत जयवंत बनसोडे ३८५४८ (२०४८९)
ब) रत्नमाला संदीप सातव ४१५९४ (२३१३६)
क) तृप्ती संतोष भरणे ४००८० (२०३३४)
ड) सुरेंद्र बापूसाहेब पठारे ३६३८८ (१७८९२)

### 'डेक्कन मिरर'ची जनमत चाचणी ठरली अचूक

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३ आणि ४ मधून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांबाबत 'डेक्कन मिरर'ने घेतलेली जनमत चाचणी अखेर अचूक ठरली आहे. या जनमत चाचणीत व्यक्त करण्यात आलेला कौल प्रत्यक्ष निवडणूक निकालाशी तंतोतंत जुळून आला असून, त्यामुळे 'डेक्कन मिरर'च्या सर्वेक्षणाची विश्वासार्हता अधोरेखित झाली आहे. मतदारांचा कल जनमत चाचणीद्वारे टिपण्यात आला होता. जनमत चाचणी खरी ठरली असून प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील निवडणूक निकालांचा अंदाज आधीच वर्तवण्यात आला होता, तो प्रत्यक्षातही खरा ठरला.



# उच्चशिक्षित ऐश्वर्या पठारे यांचे नाव महापौरपदासाठी आघाडीवर

## ■ आठ नगरसेवकांच्या पाठबळावर पठारे कुटुंब ठरले प्रभावी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या महापौरपदासाठी यंदा खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाकडून अनपेक्षित निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात असून, आयटी क्षेत्रातील उद्योजिका आणि नगरसेविका ऐश्वर्या सुरेंद्र पठारे यांचे नाव सध्या आघाडीवर असल्याची जोरदार चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे.

मुंबईत झालेल्या राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदांच्या आरक्षण सोडतीत पुण्यासाठी खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षण जाहीर झाल्यानंतर भाजपमधील मंजुषा नागपुरे, निवेदिता एकबोटे, मंजुश्री खर्डेकर, मानसी देशपांडे, रंजना टिळेकर यांसारख्या



ऐश्वर्या सुरेंद्र पठारे

अनुभवी नगरसेविकांची नावे चर्चेत होती. मात्र राजकीय समीकरणांना वेगळे वळण मिळताच वडगाव शेरी मतदारसंघात सर्वाधिक आठ नगरसेवक निवडून आणणाऱ्या पठारे कुटुंबातील ऐश्वर्या पठारे यांचे नाव पुढे आले आहे.

ऐश्वर्या पठारे या विमाननगर-लोहगाव-वाघोली प्रभागातून निवडून आल्या असून त्या उच्चशिक्षित आहेत. त्यांची स्वतःची आयटी कंपनी आहे. त्यांचे पती सुरेंद्र पठारे हे प्रभाग क्रमांक ४ (खराडी-वाघोली) मधून नगरसेवक आहेत, तर सासरे बापूसाहेब पठारे हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार आहेत. महापालिका निवडणुकीपूर्वी सुरेंद्र पठारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. भाजपने दोघांनाही उमेदवारी दिल्याने पक्षातील निष्ठावंतांमध्ये नाराजी पसरली होती; मात्र दोघांनीही मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत टीकाकारांना प्रत्युत्तर दिले.

महापौरपदासाठी महिला आरक्षण निश्चित झाल्यामुळे भाजपच्या पहिल्या फळीतील गणेश बीडकर, धीरज घाटे, श्रीनाथ भीमाले, राजेंद्र शिळीमकर, किरण दगडे, योगेश मुळीक, अनिल उर्फ बॉबी टिंगरे यांसारख्या नेत्यांना महापौरपदाच्या शर्यतीतून बाहेर राहावे लागणार असल्याने पक्षांतर्गत राजकीय गणिते बदलली आहेत.

पुण्याची ओळख आयटी शहर म्हणून असल्याने, आयटी क्षेत्रातील चेहरा, उपनगरातील प्रतिनिधित्व आणि मजबूत राजकीय पाठबळ या बाबी ऐश्वर्या पठारे यांच्या जमेच्या बाजू मानल्या जात आहेत. त्यामुळे भाजप आपली 'धक्कातंत्राची' परंपरा कायम ठेवत त्यांना संधी देणार की पक्षातील निष्ठावंत महिला नगरसेविकांनाच प्राधान्य देणार, याकडे संपूर्ण पुण्याचे राजकीय लक्ष लागून राहिले आहे.

# ६ फेब्रुवारीला पुणे महापालिकेच्या महापौरांची निवड

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणारी पहिली विशेष सभा येत्या शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येणार असून, याच सभेत महापौर व उपमहापौरांची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रशासक तथा महापालिका आयुक्त



नवल किशोर राम यांनी दिली.

महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी तारीख, वेळ तसेच सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासीन अधिकारी यांच्या नियुक्तीसाठी विभागीय आयुक्तांकडे यापूर्वीच पत्र पाठविण्यात आले होते. विभागीय आयुक्तांशी झालेल्या चर्चेनुसार ६ फेब्रुवारी २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली असून, त्यानुसार ही पहिली विशेष सभा सकाळी ११ वाजता घेण्यात येणार आहे.

या सभेचा सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचेही आयुक्त राम यांनी स्पष्ट केले. महापौरपदासाठी महिला आरक्षण निश्चित झाल्याने या निवडणुकीकडे शहराच्या राजकारणाचे विशेष लक्ष लागून राहिले असून, विविध पक्षांमध्ये हालचालींना वेग आला आहे.




# संपादकीय

## प्रजासत्ताक दिनी लोकशाहीचे मंथन: शहराचा जनादेश आणि ग्रामीण गणिते

भारतीय प्रजासत्ताक आज आपल्या ७७ व्या वर्षात पदार्पण करत असताना, अवघा देश तिरंग्याच्या अभिमानात न्हाऊन निघाला आहे. २६ जानेवारी हा केवळ संचलनाचा किंवा सुट्टीचा दिवस नाही, तर तो आम्ही भारताचे लोक म्हणून स्वतःला दिलेल्या अधिकारांच्या स्मरणाचा दिवस आहे. यंदाचा हा सोहळा महाराष्ट्रासाठी, विशेषतः पुणे जिल्ह्यासाठी अधिक महत्त्वाचा ठरला आहे, कारण नुकतीच पुणे महानगरपालिकेची रणधुमाळी शांत झाली आहे आणि आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल हा शहराच्या भविष्यातील विकासाची दिशा ठरवणारा आहे. पुणे हे आता केवळ विद्येचे माहेरघर राहिले नसून ते एक जागतिक आयटी हब आणि मेट्रो सिटी बनले आहे. वाढते शहरीकरण, वाहतूक कोंडी, पाण्याचे नियोजन आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या प्रश्नांवर ज्यांनी ठोस उत्तरे दिली, त्यांना मतदारांनी पसंती दर्शवल्याचे दिसते. लोकशाहीत निवडून आलेले प्रतिनिधी हे राज्यकर्ते नसून लोकसेवक आहेत, याची जाणीव नव्या महापालिकेला ठेवावी लागेल.

शहरात निवडणुकीचे वारे ओसरले असले तरी, ग्रामीण पुण्यात मात्र राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका चालू आहेत. जिल्हा परिषद ही मिनी विधानसभा मानली जाते. ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, शेतीला पाणी आणि पायाभूत सुविधा या मुद्द्यांभोवती ही निवडणूक फिरत आहे. शहरी आणि ग्रामीण विकासातील दरी कमी करणे, हे येणाऱ्या नवीन नेतृत्वापुढील सर्वात मोठे आव्हान असेल.

प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ तेव्हाच सिद्ध होतो जेव्हा प्रत्येक नागरिक आपल्या मतदानाच्या हक्काचा जबाबदारीने वापर करतो. पुण्याच्या निवडणुकीत काही ठिकाणी मतदानाची टक्केवारी समाधानकारक नव्हती, ही चिंतेची बाब आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी केवळ व्हॉट्सॲपवर टीका करून चालत नाही, तर प्रत्यक्ष मतदान केंद्रापर्यंत जाणे गरजेचे आहे.

संविधानाने आपल्याला जे स्वातंत्र्य दिले आहे, त्याची सुरक्षा करणे आणि योग्य प्रतिनिधी निवडणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे.

आज आपण जेव्हा ध्वजवंदन करू, तेव्हा हा संकल्प करायला हवा की, आपल्या शहराच्या आणि जिल्ह्याच्या विकासात आपण सक्रिय सहभाग घेऊ. निवडणुका येतात आणि जातात, नेते बदलतात, पण संविधानाने दिलेली लोकशाही मूल्ये कायम राहतात. पुण्याचे नागरी प्रश्न सुटावेत आणि ग्रामीण भागाचा कायापालट व्हावा, हीच आजच्या प्रजासत्ताक दिनी खरी अपेक्षा आहे.

'डेक्कन मिरर'च्या सर्व वाचकांना व भारतीयांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# अशोकबापू खांदवे मुळे वाढले भाजपा उमेदवारांचे मताधिक्य

### प्रभाग १ व ३ मधील भाजपाच्या उमेदवारांचा दणदणीत विजय

**पुणे : प्रतिनिधी**

हवेली तालुका पंचायत समितीचे माजी सभापती तथा लोहगाव परिसरातील ज्येष्ठ राजकीय नेते अशोकबापू खांदवे यांनी भाजपमध्ये प्रवेशकेल्यानंतर व्यक्त केलेला आत्मविश्वास अखेर प्रत्यक्ष निकालातून खरा ठरला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत झालेल्या पक्षप्रवेशानंतर खांदवे यांनी प्रभाग क्रमांक १ व ३ मधील भाजपच्या चारही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजय मिळेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला होता. त्यांच्या प्रवेशामुळे मिळालेल्या जनाधाराचा थेट फायदा भाजपला होत उमेदवारांना निर्णायक आघाडी मिळाल्याचे स्पष्ट झाले असून, स्थानिक राजकारणात खांदवे यांच्या प्रभाव वाढला आहे.

लोहगाव परिसरातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून अशोकबापू खांदवे यांची ओळख आहे. ग्रामपंचायत सदस्यापासून ते हवेली तालुका पंचायत समितीच्या सभापती पदापर्यंत त्यांनी यशस्वी वाटचाल केली आहे. राजकारणासोबतच व्यवसाय क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. स्थापनेपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सक्रिय असलेल्या खांदवे यांनी यापूर्वी महापालिका निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र उमेदवारी न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विनंतीनंतर त्यांनी तो अर्ज मागे घेतला होता. दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी असलेल्या निकट संबंधांमुळे तसेच प्रभाग क्रमांक एक व तीनमधील भाजप उमेदवारांना मदत करण्याच्या उद्देशाने त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या सोबत दास आप्पा खांदवे यांनीही पक्षप्रवेश केला. यावेळी माजी नगरसेवक अनिल ऊर्फ बॉबी टिंगरे उपस्थित होते.



उमेदवारांच्या विजयाचा आनंद साजरा करताना अशोकबापू खांदवे

पक्षप्रवेशानंतर लगेचच अशोकबापू खांदवे यांनी प्रभाग क्रमांक ३ मधील पदयात्रेद्वारे भाजप उमेदवारांसाठी पठारे वस्ती, शंभू पार्क, सोपाननगर, पवार वस्ती आणि काळभोर वस्ती या भागांमध्ये जावून प्रचार सुरु केला होता. प्रचारादरम्यान खांदवे यांचे ठिकठिकाणी फटाक्यांच्या आतिषबाजीत व फुलांच्या वर्षावात त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले होते. भाजपा उमेदवारांना मोठा जनाधार मिळत असल्याने विजयाची घोडदौड सुरु झाली होती. यावेळी बोलताना खांदवेनीं मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच स्वर्गीय प्रतापदादा खांदवे यांच्या कुटुंबाशी आपला स्नेह कायम असल्याचे स्पष्ट केले होते. पंचायत समितीच्या कार्यकाळात प्रभाग क्रमांक ३ मधील उमेदवारांनी सहकार्य केल्यामुळे त्यांना अधिकाधिक मताधिक्य मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच भाजप नेतृत्वाने आपल्या अनुभव आणि कार्यानुसार योग्य राजकीय पुनर्वसनाचे आश्वासन दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते.

# प्रभाग ३ मध्ये नवनिर्वाचित नगरसेवकांनी केली विकासकामांची पाहणी

### > आमदार बापूसाहेब पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेतला आढावा

**वाघोली : प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीनंतर प्रभाग क्रमांक ३ (विमाननगर-लोहगाव-वाघोली) येथील नवनिर्वाचित नगरसेवकांनी आमदार बापूसाहेब पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा केला. या पाहणीदरम्यान लोहगाव-वाघोली रस्त्यावरील जगद्गुरु कॉलनी तसेच योजना नगर परिसरातील ड्रेनेज, पाणीपुरवठा व रस्त्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यात आला.

**लोहगाव-वाघोली भागात पाहणी दौऱ्यात ड्रेनेज, पाणीपुरवठा व रस्त्यांच्या समस्यांवर दिला भर**

पाहणीदरम्यान नागरिकांनी आपल्या अडचणी थेट आमदार पठारे व अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. ड्रेनेजच्या तक्रारी, अपुरा पाणीपुरवठा आणि खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या त्रासाबाबत नागरिकांनी लक्ष वेधले. यावेळी ड्रेनेज विभाग, पाणीपुरवठा विभाग आणि पथ विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यानंतर महापालिकेच्या संपर्क कार्यालयात अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आली. या बैठकीत नवनिर्वाचित नगरसेवकांनी सुरू असलेल्या व प्रस्तावित विकासकामांचा आढावा घेत तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. आमदार बापूसाहेब पठारे यांनी प्रभागातील मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी प्राधान्याने कामे हाती घेण्याचे निर्देश दिले.



आमदार पठारे मनपा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगरसेवकांच्या समवेत विकास कामांची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना देताना

या पाहणी व बैठकीस आमदार बापूसाहेब पठारे, नवनिर्वाचित नगरसेवक रामदास दाभाडे, अनिल सातव पाटील, नगरसेविका ऐश्वर्या पठारे, डॉ. श्रेयस खांदवे, मलनिस्सारण विभागाचे मुख्य अभियंता जगदीश खानोरे, कार्यकारी अभियंता विशाल हरिभक्त, युवराज हांडे, कनिष्ठ अभियंता सिद्राम पाटील, शुभम घाटकर, प्रीतम खांदवे, राजेंद्र खांदवे, दासआप्पा खांदवे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# वाघेश्वर मंदिर संस्थानवर निरीक्षकाची काळजीवाहू म्हणून नियुक्ती

### » मा. संयुक्त धर्मदाय आयुक्त आर. के. क्षीरसागर यांचे आदेश

**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली येथील वाघेश्वर मंदिर ट्रस्टच्या प्रशासनातील वैधानिक आर्थिक व्यवहारांमध्ये अनियमिततेचे आरोप व सुरू असलेले वाद लक्षात घेता, पुढील आदेशापर्यंत संबंधित निरीक्षकाची काळजीवाहू (केअरटेकर) म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश मा. संयुक्त धर्मदाय आयुक्त आर. के. क्षीरसागर यांनी दिले आहेत. हा आदेश अर्जदाराने मूळ प्रकरणात दाखल केलेल्या अर्जावर सुनावणीअंती देण्यात आला.





वाघेश्वर मंदिराच्या देखरेखीच्या संदर्भात अर्जदार संतोष बाळासाहेब जाधव व धनाजी शामराव सातव यांनी धर्मादाय आयुक्तांकडे प्रकरण दाखल केले होते. त्या प्रकरणातील अर्जावर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून हा आदेश देण्यात आला.

सदर आदेशात नमूद करण्यात आले आहे की, ट्रस्टच्या मालमत्तेला नुकसान होण्याची शक्यता असून ती वाया जाण्याच्या धोक्यात आहे. दोन्ही पक्षांमध्ये सुरू असलेल्या वादग्रस्त दाव्यांचा विचार करता, ट्रस्टच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी आणि पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी काळजीवाहू नियुक्त करणे आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. सदरील निरीक्षक नियुक्त केल्यास मंदिर संस्थानला कोणतेही नुकसान होणार नसल्याचे नमूद आहे.

अर्जदारांनी मांडलेल्या मुद्द्यांनुसार, गाभाऱ्यात पिंडीभोवती कठडा (रेलिंग) उभारून भाविकांच्या दर्शनावर निर्बंध घालण्यात आले, तसेच तलावात व्यावसायिक तत्त्वावर मासेमारीसाठी तिसऱ्या पक्षाला ठेका देण्यात आला आणि बोट क्लबही सुरू करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले.

पूर्वी धार्मिक श्रद्धेनुसार या तलावातील मासे मारले जात नसत व कोणताही मत्स्य व्यवसाय केला जात नसल्याचा दावा अर्जात करण्यात आला. तसेच अशा प्रकारचे उपक्रम हे संबंधित ट्रस्टच्या उद्दिष्टांमध्ये बसत नसल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.

संयुक्त धर्मदाय आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार, नियुक्त करण्यात आलेला निरीक्षक वाघेश्वर मंदिर संस्थानच्या सर्व वैधानिक आर्थिक व्यवहारांची देखरेख करणार असून पुढील आदेश होईपर्यंत वाघेश्वर मंदिर संस्थानवर काळजीवाहू निरीक्षक नियुक्ती करण्याचा आदेश दिला असल्याची माहिती संबधित अर्जदारांनी दिली आहे.










'डेक्कन मिरर' हे अर्धवार्षिक मालक, मुद्रक, प्रकाशक दीपकराव नारायणराव नायक यांनी समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेएटर्सच्या शेजारी, ५३५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) यांच्याकडे छापून अनुसया पार्क, डोमखेल रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. या अर्धवार्षिकामध्ये प्रकाशित झालेल्या मजकुराबाबत मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.

Deccan Mirror, Half Yearly, is printed and published by Deepakrao Narayanrao Nayak at Shree Samarth Printer, 535 Appa Balwant Chowk, Shaniwar Peth, Pune 411030 (Maharashtra) and Published from Anusaya Park, Domkhel Road, Wagholi, Tal. Havel, Dist. Pune - 412207 (Maharashtra). Editor: Nayak Deepakrao Narayanrao. Mobile No.: 885609198.
All disputes are subject to Pune Jurisdiction.


पुणे महानगरपालिका नवनिर्वाचित नगरसेवक
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे उमेदवार
सबका साथ • सबका विकास • सबका विश्वास
प्रभाग क्र.3
श्रेयस प्रीतम खांदवे
अनिल दिलीप सातव
ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
रामदास दत्तात्रय दाभाडे
प्रभाग क्र.4
शैलजीत जयवंत बनसोडे
रत्नमाला संदीप सातव
तृप्ती संतोष भरणे
सुरेंद्र बापूसाहेब पठारे
नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
प्रजासत्ताक दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
विनायकभाऊ
दाभाडे मित्रपरिवार







# हनुमानवाडी शाळेची जिल्हास्तरावर घवघवीत कामगिरी

## > लोकनृत्यात द्वितीय क्रमांक > स्पर्धेत रचला नवा इतिहास

**पुणे : प्रतिनिधी**

नेताजी सैनिक स्कूल, फुलगाव (ता. हवेली, जि. पुणे) येथे मंगळवारी (दि. २० जानेवारी) पार पडलेल्या यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हनुमानवाडी (अष्टपूर) या शाळेने अतिशय उल्लेखनीय कामगिरी करत लोकनृत्य प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे हनुमानवाडी शाळेचे नाव जिल्हास्तरीय गुणवत्तायादीत झळकले असून शाळेने नवा इतिहास रचला आहे.

या यशासाठी गेल्या अडीच ते तीन महिन्यांपासून सहभागी विद्यार्थी, त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांनी सातत्याने मेहनत घेतली होती. त्याचेच फलित म्हणून हा जिल्हास्तरीय विजय मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. स्पर्धेच्या दिवशी निकालाची उत्सुकता अनुभवण्यासाठी पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या यशाने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या संपूर्ण प्रक्रियेत आर्थिक व इतर स्वरूपाची मदत करणाऱ्यांमध्ये रयत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामदास कोतवाल यांचे विशेष योगदान लाभले. तसेच फुलगाव येथे जाण्या-येण्याची मोफत व्यवस्था अष्टपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच व चिंतामणी टूर अँड ट्रॅव्हल्सचे गणेश दशरथ कोतवाल यांनी करून दिली. अष्टपूर गावचे पोलीस पाटील विलास कोतवाल, अनिल निवृत्ती कोतवाल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन कोतवाल, उपाध्यक्ष विशाल कोतवाल तसेच माजी अध्यक्ष सूर्यकांत कोतवाल यांचेही सहकार्य लाभले.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सचिन साळुंखे, उपशिक्षिका उषा बोर्डे यांचेसह ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.

# प्रभाग क्र. १ मध्ये ईव्हीएमविरोधात तीव्र आंदोलन

## > कळस येथे शिवसेना (शिंदे) व रिपब्लिकन सेनेने मशीन फोडून जाळल्या

- **बॅलेट पेपरवर मतदानाची मागणी**
- **न्यायालयात मागणार दाद**




**ईव्हीएम मशीनविरोधात आंदोलन करताना शिवसेना (शिंदे गट), रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक**

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ मधील कळस परिसरात शिवसेना (शिंदे गट) व रिपब्लिकन सेनेच्या वतीने ईव्हीएम मशीनविरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी ईव्हीएम मशीन फोडून त्यांना आग लावत निषेध व्यक्त केला. निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवाराला अपेक्षेपेक्षा कमी मते मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी दिसून आली.

लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवण्यात आल्याचा आरोप करत विवेक बनसोडे यांनी हातोड्याने ईव्हीएम मशीन फोडली, तर गिरिश जेवळ आणि सतीश म्हस्के यांनी मशीन पेटवून निषेध नोंदवला. यावेळी "ईव्हीएम हटवून पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे," अशी ठाम मागणी आंदोलकांकडून करण्यात आली.

ईव्हीएमविरोधातील हे आंदोलन कळस-धानोरी-लोहेगाव परिसरात करण्यात आले. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्यात येणार असल्याचे गिरीश जैवळ यांनी सांगितले. मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत असतानाही मतदानाचे आकडे कमी कसे आले, याबाबत संशय असल्याचेही त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, सतीश म्हस्के यांनी भावूक होत सांगितले की, लोकशाही टिकवण्यासाठी ईव्हीएम प्रणाली रद्द करून पारदर्शक पद्धतीने मतदान घेणे गरजेचे आहे. या निवडणूक प्रक्रियेविरोधात न्यायालयात दाद घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनावेळी सतीश म्हस्के, गिरिश जैवळ, विवेक बनसोडे, मिनाक्षी म्हस्के, हेमलता बनसोडे, प्रदीप रारावते, युवराज बनसोडे, जनार्दन वाघमारे, मारुती जाधव, नानासाहेब देवकर, वंदना देवकर, आशा परदेशी, कमल देवकर व प्रिमिला देवकर यांचेसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



प्रभाग क्रमांक १ मध्ये मतदारांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद असतानाही उमेदवारांना अत्यंत कमी मते मिळाली, हे संशयास्पद आहे. त्यामुळे ईव्हीएम प्रणालीवर आमचा विश्वास राहिलेला नाही. लोकशाही वाचवण्यासाठी ईव्हीएम हटवून बॅलेट पेपरवरच मतदान घ्यावे, ही आमची ठाम मागणी आहे. या प्रकरणी आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करणार असून, गरज पडल्यास न्यायालयातही दाद मागणार आहोत. जनतेच्या मताचा सन्मान व्हायलाच हवा, हीच आमची भूमिका आहे. - **गिरीश जैवळ**

SCAN THE QR CODE TO FOLLOW DECCAN MIRROR ON SCOCIAL MEDIA


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३,४ व ५ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
सौ. कविता महेंद्र गलांडे
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिकशुभेच्छा
* शुभेच्छुक *
श्री. गणेश (बापु) भगवान कुटे
उपाध्यक्ष : भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश


सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन..!
तसेच सर्व नागरीकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक * श्री. पै. संदिप गुलाबराव कटके
(अध्यक्ष, G K फाऊंडेशन)


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिकशुभेच्छा
* शुभेच्छुक :- श्री. गणेश बाळासाहेब सातव पाटील / श्री. मोहन अशोक सातव पाटील


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन..!
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिकशुभेच्छा
* शुभेच्छुक :- मा. श्री. अनिल ज्ञानोबा सातव (पाटील)
प्रो.प्रा. ए.एस. एंटरप्राईजेस / अध्यक्ष - माजी सैनिक कल्याण संघटना, पुणे
सर्व मित्रपरिवार पुणे विमानतळ


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. रत्नमाला संदीप सातव
पुणे महानगरपालिका नवनिर्वाचित
विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक :- संतोष (दादा) गायकवाड मित्र परिवार


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन..!
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
नगरसेविका, पुणे मनपा
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
नगरसेवक, पुणे मनपा
तसेच सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
सौ. मिनाकाकी संजय (आप्पा) सातव पाटील
श्री. संजय (आप्पा) अमृतराव सातव पाटील


BJP
पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक :- श्रीमंत गणेश तरुण मंडळ, वाघोली


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिकशुभेच्छा
* शुभेच्छुक :- श्री. संदिप आप्पा जाधव / श्री. कैलास तात्या जगताप / श्री. मंगेश अण्णा सातव

# अनधिकृत जाहिराती लावून विद्रुपीकरण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

## > विमाननगर परिसरात धडक कारवाई > महापालिका प्रशासन ॲक्शन मोडवर

**पुणे : प्रतिनिधी**

नगर रोड-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत शहर विद्रूपीकरण करणाऱ्या अनधिकृत व विनापरवाना जाहिराती करणाऱ्यांविरोधात पुणे महानगरपालिकेने कडक कारवाई करत संबंधितांवर एफआयआर दाखल केला आहे. अनेक ठिकाणी भिंती, पुणे महानगरपालिकेचे नावफलक, बसस्टॉप, तसेच विद्युत पोल यांवर पॅम्प्लेट्स चिटकवून शहराचे विद्रुपीकरण केल्याचे आढळून आल्याने धडक कारवाई करण्यात आली.



विशेषत: विमाननगर परिसरात 'दुर्वांकुर निर्मित मंगलमूर्ती पार्क' तसेच 'टू बीएचके भाड्याने घेणे' अशा स्वरूपाच्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. या पॅम्प्लेट्समुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असून शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

परिमंडळ क्रमांक एकचे उपायुक्त माधव जगताप व नगर रोड-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाचे महापालिका सहाय्यक आयुक्त संजय पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ परवाना निरीक्षक गणेश भारती, परवाना निरीक्षक केवटे व सातपुते यांनी संयुक्तपणे कारवाई करून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल केला.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, यापुढेही शहर विद्रूपीकरण करणाऱ्या अनधिकृत जाहिराती, बोर्ड, बॅनर व होर्डिंग्जवर कठोर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी व संस्थांनी कायदेशीर परवानगीशिवाय जाहिरात करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दरोड्यातील फरार आरोपी जेरबंद

## > वारजे माळवाडी पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी



अटक केलेल्या आरोपीसह वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे व तपास पथक

**पुणे : प्रतिनिधी सोलापूर शहरात ज्वेलर्सवर दरोडा टाकून महाराष्ट्रभर खळबळ उडवणारा फरार आरोपीला अखेर वारजे माळवाडी पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून फरार असलेला हा आरोपी प्रयोजना सिटी परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला जेरबंद केले आहे.**

अजिंक्य चव्हाण असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक १ जानेवारी २०२३ च्या पूर्वसंध्येला वारजे परिसरात कांबळे यांच्या निर्घृण खुनानंतर दोन प्रतिस्पर्धी गटांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर कोणताही गंभीर गुन्हा घडू नये, यासाठी वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या वतीने सातत्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत होत्या. याच गटातील सक्रिय सदस्य असलेला तसेच विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आरोपीच्या मागावर पोलीस होते. गुरुवारी (दि. २५ डिसेंबर) आरोपी हा प्रयोजना सिटी परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती गोपनीय खबऱ्यामार्फत पोलीस अंमलदार अमोल सुतकर यांना मिळाली. त्यानुसार वारजे माळवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे, अमोल सुतकर व अमित जाधव यांच्या पथकाने सापळा रचला. रात्री साडेदहा वाजता आरोपी तेथे येताच त्याला पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला

**गुन्हे वृत्त**

मात्र पोलिसांनी त्याचा पाठलाग करून प्रयोजना सिटीच्या गेटजवळ त्याला पकडण्यात यश मिळवले.

विशेष म्हणजे, विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या ज्वेलर्सवरील दरोड्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या प्रकरणातील काही आरोपींना अटक झाली असली हा फरार होता. त्याचेवर वारजे माळवाडी, विजापूर नाका (सोलापूर शहर) आणि वाळसंग (सोलापूर ग्रामीण) पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्हे दाखल आहेत.

त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सोलापूर शहर व ग्रामीण पोलिसांशी समन्वय साधण्यात आला असून, लवकरच सोलापूर पोलीस आरोपीचा ताबा घेणार आहेत.

सदरील कारवाई पोलीस उपआयुक्त संभाजी कदम, सहा. पोलीस आयुक्त डॉ. शीतल जानवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे व पोलीस निरीक्षक प्रकाश धोंडे (गुन्हे), निलेश बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली यांच्या मार्गदर्शनाखाल पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे, पोलीस अंमलदार निखिल तांगडे, अमित शेलार, योगेश वाघ, सागर कुंभार, महादेव शिंदे, शरद पाळ बालाजी काटे, सत्यजित लोंढे, अमोल सुतकर, गणेश शिंदे, अमित जाधव यांनी केली आहे.

# शिक्षणासोबत कौशल्ये हाच २०२६ मधील यशाचा मंत्र

## » करिअरसाठी कौशल्याधारित शिक्षणाला वाढते महत्त्व

आज शिक्षणाचा अर्थ झपाट्याने बदलत आहे. केवळ पदवी मिळवणे किंवा जास्त गुण मिळवणे यावर करिअर अवलंबून राहिलेले नाही. २०२६ हे असे वर्ष ठरणार आहे जिथे व्यक्तीकडे कोणती कौशल्ये आहेत, ती प्रत्यक्ष कामात कशी वापरता येतात आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची क्षमता किती आहे, यावरच भवितव्य ठरणार आहे. त्यामुळे शिक्षणासोबतच कौशल्याधारित प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे.

आजचे विद्यार्थी अनेकदा संभ्रमात असतात. कोणता कोर्स निवडावा, पुढे नोकरी मिळेल का, आवड आणि उत्पन्न यांचा समतोल कसा साधावा, असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात असतात. २०२६ मध्ये विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटर व डिजिटल स्किल्स, IT व सॉफ्टवेअर कौशल्ये, Animation, VFX, Film Making, Media Arts, Beauty & Wellness, Fashion Designing आणि Office Management यांसारख्या कौशल्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ही कौशल्ये विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळवून देत नाहीत, तर फ्रीलान्सिंग, स्वत:चा व्यवसाय आणि स्वावलंबनाची संधीही उपलब्ध करून देतात.

पालकांसाठीही हा काळ विचार करण्याचा आहे. आज पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता असते, पण सुरक्षित भविष्य हे आता केवळ पारंपरिक शिक्षणावर अवलंबून राहिलेले नाही. उद्योगांना आज अशा तरुणांची गरज आहे जे काम शिकलेले आहेत, प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे आणि स्वत: निर्णय घेण्यास सक्षम आहेत. त्यामुळे पालकांनी मुलांच्या गुणांपेक्षा त्यांच्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांवर लक्ष देणे अधिक आवश्यक झाले आहे.

याबाबत IVTCE चे संस्थापक व संचालक प्रल्हाद वारघडे पाटील सांगतात, "आजच्या काळात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही. २०२६ मध्ये करिअर घडवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत उद्योगसुसंगत कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. खतढउए मध्ये आम्ही विद्यार्थ्यांना केवळ शिकवत नाही, तर त्यांना प्रत्यक्ष करिअरसाठी तयार करतो."

कार्यरत व्यावसायिकांसाठीसुद्धा २०२६ हे वर्ष महत्त्वाचे ठरणार आहे. तंत्रज्ञान, ऑटोमेशन आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडत आहेत. अशा परिस्थितीत अपस्किलिंग आणि री-स्किलिंग केल्याशिवाय करिअरमध्ये पुढे जाणे कठीण होत चालले आहे. नवीन कौशल्ये शिकून व्यावसायिक स्वत:च्या नोकरीत प्रगती करू शकतात, अतिरिक्त उत्पन्नाचे मार्ग निर्माण करू शकतात किंवा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची संधीही मिळवू शकतात.

वाघोली, पुणे येथील IVTCE (Institute of Vocational Training & Creative Education) हे कौशल्याधारित शिक्षण देणारे आधुनिक प्रशिक्षण केंद्र असून, येथे २०२६ साठी उपयुक्त असे विविध करिअर-ओरिएंटेड प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध आहेत. Aptech अंतर्गत IT व डिजिटल स्किल्स, ZICA मार्फत Animation व VFX, ZIMA मार्फत Film Making d Media Arts, National Beauty & Wellness चे प्रमाणित कोर्सेस, National Fashion Designing Programs तसेच Office Management व Employability Skills या सर्व कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना उद्योगसुसंगत प्रशिक्षण दिले जाते.

विद्यार्थी व पालकांसाठी आणखी एक महत्त्वाची बातमी म्हणजे IVTCE ला MKCL (Maharashtra Knowledge Cor{oration Limited) चे अधिकृत प्रशिक्षण केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे. जानेवारी २०२६ पासून MKCL चे सर्व कोर्सेस IVTCE मध्ये उपलब्ध होणार आहेत. यामध्ये MSCIT, KLiC Courses, Digital Literacy व Emloyability Programs यांचा समावेश असून, या कोर्सेसमुळे विद्यार्थ्यांना शासनमान्य प्रमाणपत्र आणि रोजगारासाठी आवश्यक संगणक कौशल्ये मिळणार आहेत.

एकंदरीत पाहता, २०२६ हे वर्ष संधींनी भरलेले असणार आहे, पण या संधींचा लाभ त्यांनाच मिळेल जे आजपासून योग्य कौशल्ये शिकण्यासाठी तयार होतील. शिक्षणासोबत कौशल्ये आत्मसात करणे, योग्य मार्गदर्शन घेणे आणि प्रत्यक्ष अनुभव मिळवणे हीच यशाची गुरुकिल्ली ठरणार आहे.

# जि.प. निवडणुकीत भाजपच्या दिपाली गव्हाणेंचा विकासाचा निर्धार

## > रस्ते, वीज, पाणी, आरोग्य व शिक्षणावर भर > शेतकरी, महिला व तरुणांसाठी ठोस अजेंडा

**शिरूर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेनासह आदी पक्षांनी अर्ज दाखल केले असून तळेगाव ढमढेरे-रांजणगाव सांडस गट क्रमांक १९ मधून दिपालीताई राहुल गव्हाणे यांनी भाजपाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्ज दाखल केल्यानंतर गव्हाणे यांनी माध्यमांशी संवाद साधला. गावभेटींमध्ये नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**तळेगाव ढमढेरे-रांजणगाव सांडस गटामधून प्रचाराला वेग**

पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करताना दिपालीताई गव्हाणे म्हणाल्या, "गेल्या दोन महिन्यांत गावोगावी भेटी घेताना नागरिकांनी मनमोकळेपणाने समस्या मांडल्या. मागील काही वर्षांत रस्त्यांवरील लाईट, पाणीपुरवठा, ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर निर्माण होणारे शेतीचे प्रश्न, तसेच बिबट्याच्या वावरामुळे रात्रीच्या वीजपुरवठ्याची गरज हे मुद्दे प्रकर्षाने समोर आले आहेत."

या भागात कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असून वखारींच्या सुविधांचा अभाव, कांदा सडण्याचे प्रमाण आणि महिलांना करावे लागणारे कष्ट हे गंभीर प्रश्न असल्याचे त्यांनी नमूद केले. "शेतकऱ्यांच्या मालाला योग्य साठवणूक व प्रक्रिया सुविधा मिळाव्यात, यासाठी मी आवाज उठवणार आहे," असेही त्या म्हणाल्या.

महिलांसाठी बचत गटांच्या शासकीय योजना अधिक प्रभावीपणे पोहोचवणे, आरोग्य तपासणी शिबिरे, तसेच तरुणांना शेतीपूरक व्यवसायांकडे वळवण्यासाठी प्रशिक्षण व संधी उपलब्ध करून देण्यावर भर राहील, असे दिपालीताई यांनी सांगितले. व्यसनमुक्त व संस्कारक्षम युवा पिढी घडवण्यासाठी सामाजिक उपक्रम राबवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.



तळेगाव ढमढेरे-रांजणगाव सांडस गटातील भाजपा उमेदवार दिपाली गव्हाणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना

शिक्षणाच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमांच्या शाळांचा विकास, वाबळेवाडीतील आदर्श शाळेच्या धर्तीवर पायाभूत सुविधा व गुणवत्तावाढीचे उपक्रम राबवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. पर्यावरणाच्या दृष्टीने डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचे काम 'आई फाउंडेशन'च्या माध्यमातून हाती घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

"जनता भयमुक्त करणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रचारादरम्यान महिला, पुरुष व तरुण सर्वजण निर्भयपणे त्यांच्या अडचणी सांगत आहेत, यावरून जनतेचा विश्वास जाणवतो," असे सांगत त्यांनी येत्या काळात सर्व प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

केंद्रात, राज्यात भाजपाची सत्ता आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा भाजपाला बहुमत मिळाले आहे. भाजपची सत्ता असल्याने विकासकामे गतीने राबवता येतील, असा विश्वास व्यक्त केला. तसेच "जिल्हा परिषद निवडणुकीतही सर्वसामान्य जनता भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील." ऐश्वर्याताई पठारे, सुरेंद्र दादा पठारे तसेच कार्यकर्ते व मतदारवर्गाची भक्कम साथ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.







पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
✲ शुभेच्छुक ✲
श्री. सुनिल गुलाबराव कटके


सौ. श्रेयस प्रितम खांदवे
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. अनिल दिलीप सातव पाटील
यांची पुणे महानगरपालिकेच्या
नगरसेवक पदी
प्रचंड बहुमतांनी
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
✲ शुभेच्छुक ✲
श्री. केतनभैय्या भगवानराव जाधव
मा. चिटणीस, भारतीय जनता पार्टी, पुणे शहर


पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६
भारतीय जनता पार्टी व RPI युतीचे
सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरिकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
✲ शुभेच्छुक ✲
बी.के. एंटरप्रायझेस
भारतगॅसचे अधिकृत वितरक, वाघोली-खराडी


सौ. श्रेयस प्रितम खांदवे
श्री. अनिल दिलीप सातव
सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे
श्री. रामदास दत्तात्रय दाभाडे
श्री. शैलजीत जयवंत बनसोडे
सौ. रत्नमाला संदीप सातव
सौ. तृप्ती संतोष भरणे
श्री. सुरेंद्र बापूसाहेब पठारे
पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.३ व ४ मधील
सर्व विजयी नगरसेवकांचे
हार्दिक अभिनंदन
तसेच सर्व नागरीकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
✲ शुभेच्छुक :- श्री. मोहन (आप्पा) शिंदे


पुणे बार असोसिएशन निवडणूक (२०२६-२७)
सर्व वकील बंधु-भगिनींना
व नागरीकांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
अनु. क्र. १
खजिनदार
पदाकरिता
ॲड. अंजली शरद बांदल
✲ आपले बहुमूल्य मत देऊन उपकृत करावे हि विनंती ✲


पुणे महानगरपालिका निवडणूक २०२६
प्रभाग क्र ०१- कळस - धानोरी - लोहगाव (उर्वरित)
सौ. अश्विनी भंडारे (अ)
सौ. संगिता दांगट (ब)
श्री. अनिल (बॉबी) टिंगरे (ड)
प्रभाग क्र ०३ - लोहगाव-विमाननगर-सोमनाथनगर- वाघोली
डॉ. श्रेयस खांदवे (अ)
श्री. अनिल सातव (ब)
सौ. ऐश्वर्या पठारे (क)
श्री. रामदास दाभाडे (ड)
प्रभाग क्र ०४ - खराडी-वाघोली
श्री. शैलजित बनसोडे (अ)
सौ. रत्नमाला सातव (ब)
सौ. तृप्ती भरणे (क)
श्री. सुरेंद्र पठारे (ड)
प्रभाग क्र ०५ - कल्याणीनगर-वडगावशेरी
श्री. नारायण गलांडे (अ)
सौ. श्वेता गलांडे (ब)
सौ. कविता गलांडे (क)
श्री. योगेश मुळीक (ड)
विजय जनतेचा जनतेच्या विश्वासाचा
वडगावशेरी विधानसभा
मतदारसंघातील सर्व विजेत्या
नगरसेवकांचे
मनःपूर्वक अभिनंदन !
सर्वांना
पुढील वाटचालीसाठी
हार्दिक शुभेच्छा !
सर्व मतदार बंधू- भगिनींचे
मनापासून आभार...
श्री. अशोक (बाप्पू) ज्ञानोबा खांदवे
• माजी सभापती - हवेली तालुका पंचायत समिती
• चेअरमन-ब्रिलियंट इंटरनॅशनल स्कूल, लोहगाव
सौजन्य - बी.डी. खांदवे ग्रुप, लोहगाव